सातारा, बुधवार, २० डिसेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

Library KOREGA

ग्रंथालय कोरेगाव

# युवा वर्गाला विधायक दिशा देणे स्तुत्य

## प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत; सेवागिरी यात्रेत युवा महोत्सवाचे उद्‌घाटन

**पुसेगाव, ता. १९ :** यात्रेला केवळ उत्सव व मनोरंजनाचे स्वरूप न देता नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व युवा वर्ग या समाजघटकांच्या प्रबोधनाचा प्रयत्न श्री सेवागिरी महाराजांच्या यात्रेद्वारे होत आहे. युवा वर्गाला विधायक दिशा देऊन चांगले कलाकार घडवण्यासाठीचा प्रयत्न स्तुत्य आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले.



पुसेगाव : युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. विजयसिंह सावंत. त्यावेळी डॉ. सुरेश जाधव व अन्य.

श्री सेवागिरी महाराजांच्या यात्रेनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय खुल्या युवा महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मठाधिपती सुंदरगिरी महाराज होते. यावेळी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे, शासकीय विद्यानिकेतनचे प्राचार्य कोकरे, विश्वस्त मोहनराव जाधव, योगेश देशमुख, प्रताप जाधव, रणधीर जाधव, सुरेशशेठ जाधव, बाळासाहेब जाधव, प्राचार्य जे. के. मुळे, शिवाजीराव जाधव, हनुमानगिरी हायस्कूलचे मुख्याध्यापक डी. पी. शिंदे, सेवागिरी विद्यालयाचे मुध्याध्यापक ए. टी. सुतार, राधाकृष्ण इंग्लिश मीडियमच्या मुख्याध्यापिका हेमलता देशमुख, दीपक देशमुख, सुसेन जाधव, सुरेश पाटील उपस्थित होते.

श्री. सावंत म्हणाले, आपण टीव्ही पाहण्यासाठी वेळ देतो; पण टीव्हीवरील कार्यक्रमातील एखादा कलावंत म्हणून आपण पुढे यावे, असे आपणास वाटत नाही. त्यामुळेच आपल्या भोवतालचे फारच थोडे लोक कलाकार म्हणून चमकत असतात. कलाविष्कार ही सुध्दा ईश्वराची आराधना आहे व त्यासाठी भरपूर कष्टाची आवश्यकता आहे. पण, महाविद्यालयीन जीवनातच युवकांच्या हातून उत्कृष्ट कलाविष्कार घडावेत हे धोरण ठेवूनच प्रत्येक महाविद्यालयाचा युवा महोत्सवात सहभाग असलाच पाहिजे, असा आग्रह विद्यापीठे करतात. समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या या देवस्थान ट्रस्टची व श्री सेवागिरींच्या यात्रेची भरभराट व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

डॉ. सुरेश जाधव म्हणाले, आधुनिक युगात वाटचाल करणारी युवा पिढी भरकटली जाऊ नये, युवा वर्गाला विधायक दिशा देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, या हेतूने ट्रस्टद्वारे होणाऱ्या या युवा महोत्सवाला कलाकारांचा व रसिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. मोहन गुरव यांनी सूत्रसंचालन केले. विश्वस्त प्रताप जाधव यांनी आभार मानले.